भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# बालक सेवायोजन अधिनियम, १९३८

(१९३८ चा अधिनियम क्रमांक २६)

[ १ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Employment of Children Act, 1938

(Act No. 26 of 1938)

[*As in force on the 1st October, 1977*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

( १९७९ )

[किंमत चाळीस पैसे]

# बालक सेवायोजन अधिनियम, १९३८

## कलमांचा क्रम


प्रास्ताविका

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. विवक्षित व्यवसायांत बालकांना कामावर ठेवण्यास मनाई.

३क. अनुसूची विशोधित करण्याची शक्ती.

३ख. विवक्षित प्रक्रियांमधील काम चालू करण्यापूर्वी निरीक्षकाला नोटीस.

३ग. वयासंबंधीचे विवाद.

३घ. नोंदवही राखणे.

३ङ. कलमे ३ व ४ यांचा गोषवारा अंतर्भूत असलेली नोटीस लावणे.

४. दंड.

५. गुन्ह्यांसंबंधीची प्रक्रिया.

६. निरीक्षकांची नियुक्ती.

७. नियम करण्याची शक्ती.

८. [निरसित.]

अनुसूची.

# बालक सेवायोजन अधिनियम, १९३८

[1](१९३८ चा अधिनियम क्रमांक २६)

[१ डिसेंबर, १९३८]

**विवक्षित औद्योगिक कामधंद्यांमध्ये [2][बालकांना कामावर ठेवण्याबाबत] विनियमन करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, विवक्षित औद्योगिक कामधंद्यांमध्ये बालकांना कामावर ठेवण्याबाबत विनियमन करणे इष्ट आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास 'बालक सेवायोजन अधिनियम, १९३८' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) याचा विस्तार [11]* * * [4][संपूर्ण भारतभर] आहे.

२. या अधिनियमात— व्याख्या.

[5][(क्)] "सक्षम प्राधिकरण" याचा अर्थ, 'भारतीय बंदरे अधिनियम, १९०८' (१९०८ चा १५) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जे मोठे बंदर आहे [6][किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली जे तसे असल्याचे जाहीर करण्यात आले आहे] अशा बंदराच्या बाबतीत आणि [8]* * * * [7]* * रेल्वेच्या बाबतीत केंद्र शासन आणि अन्य कोणत्याही बाबतीत [9][राज्य] शासन असा आहे;

[5][(ख्) कार्यशाळेचा "कार्यचालक" याचा अर्थ, ज्या व्यक्तीचे कार्यशाळेच्या कारभारावर अंतिम नियंत्रण असेल अशी व्यक्ती असा आहे;

[3][(खख्) "बंदर प्राधिकरण" याचा अर्थ, बंदर आयुक्तांचा निकाय किंवा बंदराचे प्रशासन करणारे अन्य प्राधिकरण असा आहे;]

(ग्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(घ्) "कार्यशाळा" याचा अर्थ, जेथे कोणतीही औद्योगिक प्रक्रिया चालवली जाते अशी कोणतीही वास्तू (तिच्या प्रसीमा धरून) असा आहे, पण ज्या वास्तूला त्या त्या काळी [10]'कारखाने अधिनियम, १९३४' (१९३४ चा २५) याच्या ५० व्या कलमाचे उपबंध लागू होत असतील अशी कोणतीही वास्तू त्यामध्ये समाविष्ट नाही.]

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा—गॅझेट ऑफ इंडिया, भाग पाच, पृष्ठ २८४.

हा अधिनियम पुढील प्रदेशांना लागू करण्यात आला आहे :—

दार्जिलिंग जिल्हा—१ ऑक्टोबर, १९३९ रोजी व तेव्हापासून, पहा—अधिसूचना क्रमांक ३०१ कॉम., दिनांक २६ सप्टेंबर, १९३९, कलकत्ता गॅझेट, दिनांक २८ सप्टेंबर, १९३९.

ओरिसा राज्यातील वर्जित क्षेत्रे—ओरिसा शासन अधिसूचना क्रमांक १४४४—तीन—सी—१४/४१—कॉम., दिनांक १६ एप्रिल, १९४१ याद्वारे.

२. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ४८)-कलम २ द्वारे "बालकांना प्रवेश देण्याबाबत" याऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९५१ रोजी व तेव्हापासून.)

३. कित्ता—कलम ३ द्वारे जादा दाखल केले (१ सप्टेंबर, १९५१ रोजी व तेव्हापासून).

४. 'अनुकूलन आदेश १९५०' द्वारे "भारताच्या सर्व प्रांतांवर" या मजकुराऐवजी घातले.

५. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १५)—कलम २ द्वारे कलम २ मधील मूळ परिच्छेदाला 'खंड (क्)' असा नवीन क्रमांक दिला व खंड (ख्), (ग्) व (घ्) घातले.

६. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे जादा दाखल केले. पहा 'मोठी बंदरे अधिनियम, १९६३'.

७. कित्ता—याद्वारे "फेडरल" हा शब्द गाळला.

८. कित्ता—याद्वारे "'भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे" हे शब्द गाळले.

९. कित्ता—याद्वारे "प्रांतीय" या शब्दाऐवजी घातले.

१०. आता 'कारखाने अधिनियम, १९४८' (१९४८ चा ४३)-कलम ६७ व ७ वे प्रकरण पहा.

११. १९५१ चा अधिनियम ३ याद्वारे मूळ मजकुराऐवजी "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द घातले होते, ते १९७० चा अधिनियम ५१-कलम २ व अनुसूची यांद्वारे गाळले.

विवक्षित व्यवसायांत बालकांना कामावर ठेवण्यास मनाई.

३. [१][(१) ज्याच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशा कोणत्याही बालकास—

(क्) प्रवासी, माल किंवा डाक यांची रेल्वेने वाहतूक करण्याशी निगडित असलेल्या ; किंवा

[६][(ख्) रेल्वेच्या आवारात कोळसागाळ गोळा करणे, राखेची खळी उपसणे किंवा बांधकामविषयक कामे यांच्याशी निगडित असलेल्या ; किंवा

(ग्) रेल्वे स्टेशनवरील खान-पान सेवेतील विक्रेत्याला वा इतर कोणत्याही कर्मचाऱ्याला ज्या कामांकरिता एका फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जावे लागते अथवा गाडी चालू असताना चढावे-उतरावे लागते अशा कामाशी निगडित असलेल्या ; किंवा

(घ्) रेल्वे स्टेशनच्या बांधकामासंबंधीच्या कामाशी निगडित असलेल्या किंवा जे काम रेल्वे रुळांच्या अगदी जवळ किंवा रुळांच्या मध्ये करावयाचे असते अशा कामाशी निगडित असलेल्या ; किंवा ]

[६][(ङ्) ] कोणत्याही बंदराच्या सीमेत एखाद्या बंदर प्राधिकरणाशी निगडित असलेल्या

कोणत्याही व्यवसायात कामावर ठेवण्यात येणार नाही किंवा काम करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

(२) ज्याच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण झाली आहेत पण सतरावे वर्ष पूर्ण झालेले नाही अशा कोणत्याही बालकाला कामावर ठेवताना, अशा बालकाचे कोणत्याही दिवशीचे कामाचे तास जेणेकरून त्याला किमान लागोपाठ बारा तास विश्रांतीचे मध्यंतर मिळेल अशा प्रकारे निश्चित केल्याशिवाय त्याला पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यवसायात कामावर ठेवण्यात येणार नाही किंवा काम करण्याची परवानगी देण्यात येणार नाही आणि त्या विश्रामकालात रात्री १० ते सकाळी ७ यांच्या दरम्यानचे विहित असतील असे लागोपाठचे किमान सात तास समाविष्ट असतील :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट, यामध्ये निर्देशिलेल्या बालकाला, विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि अशा शर्तीनुसार, उपरोक्त अशा कोणत्याही व्यवसायात शिकाऊ उमेदवार म्हणून किंवा त्यामध्ये व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याच्या प्रयोजनाकरिता कामावर ठेवण्यात आले असताना किंवा काम करण्याची परवानगी दिलेली असताना त्याला लागू होणार नाही :

परंतु आणखी असे की, आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तशी आवश्यकता आहे असे जेव्हा सक्षम प्राधिकरणाचे मत असेल तेव्हा **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ते या पोटकलमाचे उपबंध अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत अंमलात राहणार नाहीत असे घोषित करू शकेल.]

[२][(३) ज्याच्या वयाला [४][चौदा] वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशा कोणत्याही बालकास, अनुसूचीमध्ये दिलेल्यांपैकी कोणतीही प्रक्रिया जेथे चालवली जात असेल अशा कोणत्याही कार्यशाळेत कामावर ठेवण्यात येणार नाही किंवा तेथे काम करण्याची परवानगी दिली जाणार नाही :

परंतु, या पोटकलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, जेथे कार्यचालक फक्त आपल्या कुटुंबियांच्याच मदतीने आणि मजुरीवर कामगार न लावता कोणतीही प्रक्रिया करतो अशा कार्यशाळेस किंवा [५][राज्य] शासनाकडून सहाय्य किंवा मान्यता मिळत असलेल्या अशा कोणत्याही शाळेला लागू होणार नाही.].

[३][अनुसूची विशोधित करण्याची शक्ती.]

[३][३ क. [५][राज्य] शासन तसा आपला उद्देश असल्याबाबत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कमीत कमी तीन महिन्यांची नोटीस देऊन, तशाच अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये कोणत्याही प्रक्रियेचे वर्णन दाखल करू शकेल व तदनंतर ही अनुसूची तदनुसार ती अधिनियमित केलेली असावी अशा प्रकारे [५][राज्यात] अंमलात येईल.]

[३][ विवक्षित प्रक्रियांमधील काम चालू करण्यापूर्वी निरीक्षकाला नोटीस.]

[३][३ ख. (१) १ ऑक्टोबर, १९३९ या दिवसानंतर कोणत्याही कार्यशाळेत, अनुसूचीत दिलेल्यांपैकी कोणतीही प्रक्रिया चालवली जाण्यापूर्वी, कार्यचालक ज्याच्या स्थानिक सीमांमध्ये कार्यशाळा येते अशा निरीक्षकाला पुढील गोष्टींचा अंतर्भाव असलेली लेखी नोटीस पाठवील :—

(क्) कार्यशाळेचे नाव व पत्ता,

(ख्) कार्यशाळेचे प्रत्यक्ष व्यवस्थापन करणाऱ्या व्यक्तीचे नाव,

(ग्) ज्या पत्त्यावर कार्यशाळेशी पत्रव्यवहार केला पाहिजे तो पत्ता, आणि

(घ्) कार्यशाळेत करावयाच्या प्रक्रियांचे स्वरूप.

(२) जम्मू व काश्मीर राज्यात हा अधिनियम लागू करताना, १ ऑक्टोबर, १९३९ या दिवसाचा निर्देश हा उक्त राज्यामध्ये हा अधिनियम लागू झाल्याचा निर्देश आहे असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.]

---

१. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ४८)-कलम ४ द्वारे पोटकलमे (१) आणि (२) ऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९५१ रोजी व तेव्हापासून).

२. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १५)-कलम ३ द्वारे जादा दाखल केले (१ ऑक्टोबर, १९३९ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ४ द्वारे जादा दाखल केले (१ ऑक्टोबर, १९३९ रोजी व तेव्हापासून).

४. 'कारखाने अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३)-कलम ११९ द्वारे "बारा" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

५. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे प्रांताच्या उल्लेखांऐवजी राज्याचे उल्लेख घालण्यात आले.

६. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९७८' (१९७८ चा ३९)-कलम २ द्वारे मूळ खंड (ख्) ला 'खंड (ङ्)' हा नवीन क्रमांक दिला व खंड (ख्), (ग्) व (घ्) घातले.

[1][३ ग. [2][नियोक्त्याने ज्याला कामावर ठेवले आहे किंवा काम करण्याची परवानगी दिली आहे अशा कोणत्याही बालकाच्या वयासंबंधी] निरीक्षक व नियोक्ता यांच्यामध्ये वाद उपस्थित झाल्यास, अशा बालकाच्या वयाबाबत विहित वैद्यकीय प्राधिकरणाने प्रमाणपत्र दिलेले नसल्यास, निरीक्षक तो प्रश्न विहित वैद्यकीय प्राधिकरणाकडे निर्णयाकरता सोपवील.] [1][वयासंबंधीचे विवाद.]

[3][३ घ. प्रत्येक नियोक्ता कलम ३-पोटकलम (२) च्या अनुरोधाने, त्या कलमाच्या पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या व्यवसायात कामावर ठेवलेल्या किंवा काम करण्याची परवानगी दिलेल्या बालकांसंबंधी एक नोंदवही राखील आणि कामाच्या वेळात सर्वकाळ किंवा अशा कोणत्याही व्यवसायातील काम चालू असेल त्यावेळी निरीक्षकाला ती निरीक्षणासाठी उपलब्ध असेल व त्या नोंदवहीत पुढील गोष्टी दर्शविण्यात येतील :— [3][नोंदवही राखणे.]

(क्) अशा प्रकारे कामावर ठेवलेल्या किंवा काम करण्याची परवानगी दिलेल्या, सतरा वर्षांखालील प्रत्येक बालकाचे नाव व जन्मदिनांक;

(ख्) अशा कोणत्याही बालकाच्या कामाच्या वेळा व त्याचा हक्काच्या विश्रांतीचा मध्यंतरकाळ;

(ग्) अशा कोणत्याही बालकाच्या कामाचे स्वरूप ; आणि

(घ्) विहित करण्यात येईल असा अन्य तपशील.]

[3][३ङ. प्रत्येक रेल्वे प्रशासन [4][, प्रत्येक बंदर प्राधिकरण आणि प्रत्येक नियोक्ता हा,] प्रकरणपरत्वे त्या रेल्वेच्या प्रत्येक स्टेशनावर किंवा बंदराच्या सीमांमध्ये [5][किंवा कामाच्या ठिकाणी] जे सहज दिसू शकेल व जेथे सहज जाता येईल अशा ठिकाणी या अधिनियमाच्या कलम ३ ची पोटकलमे (१) व (२) आणि कलम ४ यांचा गोषवारा अंतर्भूत असणारी नोटीस विहित करण्यात येईल अशा भारतीय भाषेत किंवा भाषांमध्ये आणि इंग्रजी भाषेमध्ये लावण्याची तजवीज करील. [3][कलमे ३ व ४ यांचा गोषवारा अंतर्भूत असलेली नोटीस लावणे.]

**स्पष्टीकरण.**—या कलमात—

"रेल्वे प्रशासन" याला 'भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०' (१८९० चा ९) यामध्ये नेमून दिलेलाच अर्थ आहे.]

[6][४. जो कोणी— [6][दंड.]

(क्) कलम ३ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून कोणत्याही बालकास कामावर ठेवील किंवा काम करण्याची परवानगी देईल; किंवा

(ख्) कलम ३ ख द्वारे आवश्यक असलेली नोटीस देण्यास चुकेल; किंवा

(ग्) कलम ३ घ अनुसार आवश्यक असलेली नोंदवही राखण्यास चुकेल किंवा अशा कोणत्याही नोंदवहीत खोटी नोंद करील; [7][किंवा]

[7][(घ्) कलम ३ङ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे, कलम ३ ची पोटकलमे (१) व (२) आणि कलम ४ यांचा गोषवारा अंतर्भूत असणारी नोटीस लावण्यास चुकेल,]

तो एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.]

५. (१) या अधिनियमाखालील कोणताही अभियोग कलम ६ अन्वये नियुक्त केलेल्या निरीक्षकाखेरीज किंवा त्याच्या पूर्वमंजुरीखेरीज इतर कोणालाही दाखल करता येणार नाही. गुन्ह्यांसंबंधीची प्रक्रिया.

[8][(२) बालकाच्या वयासंबंधी विहित वैद्यकीय प्राधिकरणाने दिलेले प्रत्येक प्रमाणपत्र या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ते ज्याच्या संबंधीचे असेल त्या बालकाच्या वयाबाबतचा निर्णायक पुरावा असेल.]

---

१. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १५)—कलम ४ द्वारे जादा दाखल केले (१ ऑक्टोबर, १९३९ रोजी व तेव्हापासून).

२. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९४९' (१९४९ चा ४०)-कलम ३ व २री अनुसूची यांद्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (१ मे, १९४९ रोजी व तेव्हापासून).

३. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ४८)- कलम ५ द्वारे कलमे ३घ आणि ३ङ जादा दाखल केली (१ सप्टेंबर, १९५१ रोजी व तेव्हापासून).

४. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९७८' (१९७८ चा ३९)-कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

५. कित्ता—कलम ३ द्वारे घातले.

६. 'बालक सेवायोजन अधिनियम, १९५१' (१९५१ चा ४८)—कलम ६ द्वारे मूळच्या कलम ४ ऐवजी घातले (१ सप्टेंबर, १९५१ रोजी व तेव्हापासून).

७. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९७८' (१९७८ चा ३९)—कलम ५ द्वारे घातले.

८. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १५)-कलम ६ द्वारे पोटकलम (२) ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९३९ रोजी व तेव्हापासून).

(३) इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही.

निरीक्षकांची नियुक्ती. ६. सक्षम प्राधिकरण, या अधिनियमाच्या उपबंधांचे अनुपालन निश्चितपणे व्हावे यासाठी काही व्यक्तींना निरीक्षक म्हणून नियुक्त करू शकेल व अशा रीतीने नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक 'भारतीय दंड संहिता' (१९६० चा ४५) याच्या अर्थानुसार लोक सेवक असल्याचे मानले जाईल.

नियम करण्याची शक्ती. ७. (१) सक्षम प्राधिकरण या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने नियम[1] करू शकेल.

(२) विशेषेकरून व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे—

(क) कलम ६ अन्वये नियुक्त केलेल्या निरीक्षकांनी अनुसरावयाच्या प्रक्रियेचे विनियमन करता येईल; [2][ * * * ]

(ख) कामावर असलेल्या किंवा कामधंद्याच्या शोधात असलेल्या अल्पवयीन व्यक्तींच्या संबंधात वयाचे प्रमाणपत्र मंजूर करणे, अशी प्रमाणपत्रे देऊ शकणारी [4][वैद्यकीय प्राधिकरणे], अशा प्रमाणपत्राचा नमुना, त्याबद्दल आकारता येईल ते शुल्क व ज्या रीतीने अशी प्रमाणपत्रे देता येतील ती रीत याकरिता उपबंध करता येईल:

परंतु, जर अर्जाच्या सोबत, संबंधित प्राधिकरणाने समाधानकारक मानलेला असा वयाचा पुरावा असेल तर, असे कोणतेही प्रमाणपत्र देण्याबद्दल कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही;

[3][(ग) कलम ३-पोटकलम (२) च्या प्रयोजनार्थ रात्री १० ते सकाळी ७ या दरम्यान लागोपाठचे सात तास निश्चित करता येतील;

(घ) कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यवसायात शिकाऊ उमेदवार म्हणून किंवा व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याच्या प्रयोजनाकरिता एखाद्या बालकाला कोणत्या परिस्थितीत व कोणत्या शर्तीच्या अधीनतेने कामावर ठेवता येईल किंवा काम करण्याची परवानगी देता येईल ते विनिर्दिष्ट करता येईल;

(ङ) कलम ३घ खाली राखावयाच्या नोंदवहीत अन्य कोणता तपशील असावयास हवा ते विनिर्दिष्ट करता येईल;

(च) कलम ३ङ मध्ये निर्देशिलेली नोटीस कोणत्या भारतीय भाषेत किंवा भाषांमध्ये प्रकाशित करावयाची ते विनिर्दिष्ट करता येईल; आणि

(छ) ज्यांच्यावर नियंत्रण ठेवता येणे शक्य होणार नाही किंवा ज्यांचा आगाऊ अंदाज बांधता येणार नाही, जे नियतकालिक स्वरूपाचे नाहीत व ज्यांमुळे कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यवसायाच्या नेहमीच्या कामकाजात अडथळा येईल अशा आणीबाणीच्या प्रसंगांच्या बाबतीत कलम ३-पोटकलम (२) च्या उपबंधांतून सूट देण्याचा उपबंध करता येईल.]

[5][(३) केंद्र शासनाने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

---

१. केंद्र शासनाने तयार केलेल्या अशा नियमांकरिता पहा— गॅझेट ऑफ इंडिया, १९४०, भाग एक, दिनांक ३० नोव्हेंबर, १९४०.

'बालक सेवायोजन (रेल्वे) नियम, १९५५' याकरिता पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९५५, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ २३२५ आणि 'बालक सेवायोजन (मोठी बंदरे) नियम, १९५५' याकरिता पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९५५, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ २३४६.

२. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ४८)-कलम ७ द्वारे "आणि" हा शब्द वगळला (१ सप्टेंबर, १९५१ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ७ द्वारे जादा दाखल केले (१ सप्टेंबर, १९५१ रोजी व तेव्हापासून).

४. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १५)-कलम ७ द्वारे "प्राधिकरणे" या शब्दाऐवजी घातला (१ ऑक्टोबर, १९३९ रोजी व तेव्हापासून).

५. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९७८' (१९७८ चा ३९)—कलम ५ द्वारे घातले.

८. [१९०८ चा अधिनियम १५ वा–कलम ६ चे विशोधन.] 'निरसन व विशोधन अधिनियम, १९४२' (१९४२ चा २५)-कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे निरसित.

[1][**अनुसूची**

(कलम ३, ३क व ३ख पहा)

**प्रक्रियांची सूची**

१. विड्या वळणे.

२. गालिचे विणणे.

३. सिमेंट बनवणे—सिमेंट पोत्यात भरण्याच्या कामासुद्धा.

४. कापडावर छापणे, ते रंगवणे व विणणे.

५. आगपेट्या, स्फोटक द्रव्ये व दारूकामाची सामग्री बनवणे.

६. अभ्रक कापणे व त्याचे तुकडे करणे.

७. लाख बनवणे.

८. साबण बनविणे.

९. कातडी कमावणे.

१०. लोकर साफ करणे.]

---

१. 'बालक सेवायोजन (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १५)-कलम ८ द्वारे जादा दाखल केले (१ ऑक्टोबर, १९३९ रोजी व तेव्हापासून).

## THE EMPLOYMENT OF CHILDREN ACT, 1938

### बालक सेवायोजन अधिनियम, १९३८

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| ash pit | राखेची खळी | [S. 3(1)(b)] |
| cinder picking | कोळसागाळ गोळा करणे | [S. 3(1)(b)] |
| competent authority | सक्षम प्राधिकरण | [S. 2(a)] |
| make charge | शुल्क आकारणे | [S. 7(2)(b)] |
| occupier | कार्यचालक | [S. 2(b)] |
| port authority | बंदर प्राधिकरण | [S. 2(bb)] |
| railway administration | रेल्वे प्रशासन | [S. 3E-expl.] |
| workshop | कार्यशाळा | [S. 2(d)] |

---

## बालक सेवायोजन अधिनियम, १९३८

### THE EMPLOYMENT OF CHILDREN ACT, 1938

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| कार्यचालक | occupier | [S. 2(b)] |
| कार्यशाळा | workshop | [S. 2(d)] |
| कोळसागाळ गोळा करणे | cinder picking | [S. 3(1)(b)] |
| बंदर प्राधिकरण | port authority | [S. 2(bb)] |
| राखेची खळी | ash pit | [S. 3(1)(b)] |
| रेल्वे प्रशासन | railway administration | [S. 3E–expl.] |
| शुल्क आकारणे | make charge | [S. 7(2)(b)] |
| सक्षम प्राधिकरण | competent authority | [S. 2(a)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई